Title of Programme: **रोजगाराच्या संधी आणि कौशल्याधारित प्रशिक्षण – व्याख्यान**

Name of Organizing Department : **मराठी विभाग**

Name of the Coordinator of the Programme: **डॉ. संजय शिंदे**

Date of the Programme : १५/१०/२०२६

Venue: **हुतात्मा राजगुरू महाविद्यालय राजगुरुनगर**

Target Group: **तृतीय वर्ष कला शाखा**

Number of Participants: ४०

Name of Resource Person: **- मा. पंकज कुमार** (जेएसडब्ल्यू एमआय स्किल सेंटर, पुणे)

Total Expenditure for the Programme: - ----

Source of Funding: - ----

**Report: रोजगाराच्या संधी आणि कौशल्याधारित प्रशिक्षण कार्यक्रम अहवाल**

खेड तालुका शिक्षण प्रसाराम मंडळाचे हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने दि. १५/१०/२०२६ रोजी तृतीय वर्ष कला शाखेच्या विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी आणि कौशल्याधारित प्रशिक्षणाची माहिती मिळावी, या उद्देशाने जेएसडब्ल्यू एमआय स्किल सेंटर, पुणे यांच्या वतीने मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी स्किल सेंटरच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांना फिटर फॅब्रिकेशन या रोजगाराभिमुख प्रशिक्षण अभ्यासक्रमाची माहिती दिली. या अभ्यासक्रमांतर्गत वेल्डिंग, फॅब्रिकेशन तसेच औद्योगिक क्षेत्रात आवश्यक असणाऱ्या तांत्रिक कौशल्यांचे प्रशिक्षण दिले जाते. दहावी, बारावी, आयटीआय आणि पदविकाधारक विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध असलेल्या या प्रशिक्षणाची प्रवेशक्षमता, पात्रता आणि रोजगाराच्या संधी यांविषयी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या प्रशिक्षणाचे वैशिष्ट्य म्हणजे ते १०० टक्के मोफत असून, प्रशिक्षणासोबत संगणक व सॉफ्ट स्किल्सचे वर्ग, उद्योजकतेविषयी मार्गदर्शन, कौशल्यांचे मूल्यमापन, प्रमाणपत्र आणि रोजगार मिळविण्यासाठी सहकार्य अशा सुविधा उपलब्ध आहेत. तसेच स्वयंरोजगाराच्या संधींची माहितीही विद्यार्थ्यांना देण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे आणि उपप्राचार्य व मराठी विभागप्रमुख डॉ. संजय शिंदे यांनी स्किल सेंटरच्या प्रतिनिधींचे स्वागत केले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत व्यावसायिक कौशल्ये आत्मसात करावीत, रोजगाराच्या विविध संधींची माहिती घ्यावी आणि स्वतःच्या क्षमता विकसित करण्यासाठी उपलब्ध प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, या दृष्टीने हा उपक्रम उपयुक्त ठरला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना कौशल्याधारित प्रशिक्षण, रोजगाराच्या संधी आणि स्वयंरोजगाराच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. संजय शिंदे यांनी केले, तर आभार डॉ. बाळासाहेब अनुसे यांनी मानले.

डॉ. संजय शिंदे
मराठी विभाग प्रमुख
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.

डॉ. शिरीष पिंगळे
प्राचार्य
हुतात्मा राजगुरु महाविद्यालय
राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे.



HRM

## कार्यक्रमाचे छायाचित्रे



मा. पंकज कुमार



उपस्थित विद्यार्थिनी



उपस्थित विद्यार्थी